## भेट तुझी...

भेट तुझी जर झाली नसती –
स्पर्श बावरा मनांत अलगद
हळूच मिटूनी गेला असता
कृष्ण सावळा राधेचा मग
गोकुळी हरवून बसला नसता ।

भेट तुझी जर झाली नसती –
मौनामधले शब्द अलवार
ओठी विरून गेले असते
नयनामधील भाव मनोहर
गाली गुलाब फुलला नसता ।

भेट तुझी जर झाली नसती –
ऋतू श्रावण हिरवा होऊन
मेघात दडून बसला असता
ऊनपावसाचा खेळ असा हा
धरती वरती रंगला नसता ।

भेट तुझी जर झाली नसती –
इंद्रधनुचा पूल का मग
धरतीवरती कलला असता
स्वप्नासाठी हृदय द्यायचा
हट्ट मनाने धरला नसता ।

भेट तुझी जर झाली नसती –
कविता माझी मनांत माझिया
नकळे हरवून गेली असती
माझ्यासाठी गंधित होऊन
कशी उमलून आली असती ।

भेट तुझी जर झाली नसती
भेट तुझी जर झाली नसती....

लीना माटे
मो. ९८१९५३४४२८

